## राज्य भूजल प्राधिकरणाची बैठक दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी दुपारी ३:०० वाजता झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त

सभेला खालील सदस्य उपस्थित होते

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संजय कुलकर्णी | - | सदस्य (अभिसं) |
| २.श्रीमती श्वेताली ठाकरे | - | सदस्य (अर्थ) - बैठकीच्या अध्यक्ष |
| ३. डॉ. साधना महाशब्दे | - | सदस्य (विधी) |

इतर उपस्थित अधिकारी

| | | |
|---|---|---|
| १. डॉ. रामनाथ सोनवणे | - | सचिव |
| २. श्री. प्रशांत वोरसे | - | संचालक |
| ३. श्री. रोहन सोडळ | - | उप- संचालक |
| ४. श्री. दिलीप पाटोळे | - | सहायक संचालक |
| ५. श्री प्रभाकर खिरे | - | सल्लागार |

मुद्दा क्र. १

CGWA ने अधिसूचित केलेल्या दि. २४ संप्टेवर, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांवर कार्यवाही करणेवावत.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ (भूसविनि) च्या तरतुदींची अंमलबजावणीसाठी आवश्यक नियम अद्याप अधिसूचित झाले नसल्याने आणि केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्याच्या भूजल अधिनियमात करावे लागणारे बदल या पार्श्वभूमीवर करावयाची कार्यवाही, तसेच विंधन यंत्र मालक / चालकांच्या नोंदणीवावत मजनिप्राने दिनांक १७.०२.२०२२ रोजी दुपारी ३:०० वाजता प्राधिकरणाची बैठक घेतली. प्राधिकरणातील मा. सदस्य (अर्थ), यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत मा. सदस्य (विधी) उपस्थित होते आणि मा. सदस्य (अभि.) व आयुक्त तथा संचालक, भूसविनि VC (video conferencing) द्वारे उपस्थित होते. सचिवांनी बैठकीत उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले. अध्यक्षांच्या परवानगीने, सभेत खालिल विषयपत्रिकेवर चर्चा व विचारविनिमय करण्यात आला.

आताच्या प्राधिकरणाची भूजल विषयक ही पहिलीच वैठक असल्याचे सांगून सचिव यांनी विषयसूचीनुसार वैठकीचे प्रयोजन स्पष्ट केले. केंद्रीय भूमिजल प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना व महाराष्ट्र भूजल अधिनियमातील तफावती दूर करण्यासाठी कायद्यात वदल करणेवावत मजनिप्राने दिनांक २८.१०.२०२१ च्या पत्रान्वये अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंवई यांना कळविल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

- सदस्य (विधी) यांनी त्यावावतच्या कायदेशीर तरतुदी (घटनेच्या आर्टिकल १४२, २५४ व भूजल कायद्याच्या कलम ४८ नुसार) विषद केले. शिवाय कलम ४ अंतर्गत क्षेत्र अधिसूचित करण्याचे काम तावडतोव हाती घ्यावे असे सुचविले.
- भूसविय च्या आयुक्तांनी क्षेत्र अधिसूचनेचे सर्व १२ जिल्हयांचे प्रस्ताव प्राधिकरणास पाठविण्याचे सांगितले त्यावर सदस्य (अभि.) यांनी जिल्हावार प्रस्तावांची छाननी मजनिप्रा हाती घईल असे स्पष्ट केले.
- आयुक्त, भूसविय यांनी कायद्यात दुरुस्ती व त्यानुसार नियम करण्यासाठी येत्या १५ दिवसांत शासनास त्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सांगितले.
- सचिव मजनिप्रा, यांनी प्रस्ताव सादर केल्यानंतर प्राधिकरणाच्या वतिने अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंवई यांना भेटून प्रस्ताव मान्य करण्याची विनंती केली जाईल असे सांगितले.
- दरम्यान कायद्यातील सुधारणा व नियम अंतिम होईतो पर्यंत CGWA च्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत शासनास पाठविण्यात यावा असे सुचविण्यात आले आहे.

मुद्दा क्र. २

भूजल (विकास व व्यवस्थापन) (भूसविय) अधिनियम, २००९ मधील कलम १२ नुसार विंधन यंत्र मालकांची/चालविणा-याची नोंदणी कारणेच्या प्रस्तावावावत.

- विंधन यंत्र मालक/चालकांच्या नोंदणीवावत भूसवियंने शासनास प्रस्ताव पाठविला आहे. त्यांनुसार त्यांना शासनमान्यतेने हे काम हाती घेण्यात प्राधिकरणाची कोणतीही हरकत नसल्याचे वैठकीत नमूद करण्यात आले आहे.
- भूजल अधिनियमातील तरतुदींच्या अंमलवजावणीवावत भूसवियं कडून आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याचे आयुक्त यांनी मान्य केले.
- सचिव यांनी सर्वांचे आभार मानून वैठक समाप्त झाल्याचे सांगितले.

आभार प्रदर्शन:

सर्व उपस्थितांचे आभार मानून सभेची समाप्ती करण्यात आली.

दिनांक: १७/०२/२०२२

स्थळ: मुंवई

सचिव

श्री. संजय कुलकर्णी
सदस्य (अभिसं)

डॉ. साधना महाशब्दे
सदस्य (विधी)

श्रीमती श्वेताली ठाकरे
सदस्य (अर्थ)
बैठकीच्या अध्यक्ष

२८/०३